**University of Mumbai**

क्र. एफएओ/आयसीडी/२०१८–१९/9
दिनांक :२४ डिसेंबर, २०१८

परिपत्रक:—

विषय:— मे.एम.एस. जाधव ॲण्ड कंपनी यांच्याकडून ताळमेळ (Reconcilition) सनदी लेखापरिक्षकांकडून लेखापरिक्षित केलेली महाविद्यालयाकडून येणे असलेले विविध प्रकारचे प्रलबित शुल्काबाबत.

उपरोक्त विषयान्वये मुंबई विद्यापीठाशी संलग्नित सर्व शासकीय, अशासकीय, अनुदानीत, विनाअनुदानीत महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संस्थापक/संचालक तसेच मुंबई विद्यापीठाच्या विविध विभागांचे विभागप्रमुख आणि संचालक यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, मे. एम. एस. जाधव ॲण्ड कंपनी या सनदी लेखापाल यांस मुंबई विद्यापीठाने विविध महाविद्यालयांकडून येणे असलेल्या विविध शुल्काचे ताळमेळ करण्याकरिता नियुक्त केलेले आहे व त्यांनी सर्व महाविद्यायांकडून येणे असलेले शुल्कांचे लेखापरिक्षण करण्यात आले. सदर शुल्कामध्ये संलग्नता शुल्क, वार्षिक राज्यस्तरीय योगदान, विद्यार्थी विकास निधी योगदान, नैसर्गिक आपत्ती निधी, ई—चार्जेस, ई—सुविधा शुल्क, एन.एस.एस शुल्क, एन.एस.एस. नोंदणी शुल्क, पात्रता नोंदणी शुल्क, नोंदणी शुल्क, क्रिडा योगदान निधी आणि कुलगुरू निधी यांचा समावेश आहे.

विविध महाविद्यालयाकडून विविध प्रकारचे शुल्क मुंबई विद्यपीठास येणे बाकी आहे असा अंतरिम अहवाल मे. एम.एस. जाधव ॲण्ड कंपनी या सनदी लेखापालांकडून विद्यापीठास सादर करण्यात आला आहे. सदर अहवालानुसार आपल्या महाविद्यालयाकडून मुंबई विद्यापीठास येणे असलेले प्रलंबित असलेले शुल्क रोख विभाग, वित्त व लेखा विभाग, फोर्ट, मुंबई — ३२ येथे त्वरीत भरणा करण्यात यावा किंवा मुंबई विद्यापीठाचे खाते क्र.०६९६०१००००२००८, बॅक ऑफ बडोदा, फोर्ट शाखा, IFSC – BARB0FORTUN (Fifth Character is Zero) मध्ये जमा करण्यात यावा.

सदर शुल्क भरणा केलेली सविस्तर माहिती unacbooks69@gmail.com या ईमेल वर पाठविण्यात यावी.

सदर परिपत्रक मुंबई विद्यापीठाच्या www.mu.ac.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

वित्त व लेखा अधिकारी
मुंबई विद्यापीठ

मुंबई — ४०० ०३२.
दिनांक: २४ डिसेंबर, २०१८

**प्रत माहितीकरिता व योग्य त्या कार्यवाही करिता.**

१. मुंबई विद्यापीठाशी संलग्नित सर्व शासकीय, अशासकीय, अनुदानीत, विनाअनुदानीत महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संस्थापक/संचालक तसेच मुंबई विद्यापीठाच्या विविध विभागांचे विभागप्रमुख आणि संचालक

LETTER